7:10 AM 0.4KB/s 89

# सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सायबर सेक्युरिटीबाबत मार्गदर्शन




**अकोला ।** दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी संचालित सीताबाई कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात संस्थेचे अध्यक्ष मोतीसिंह मोहता, सचिव पवन कुमार माहेश्वरी, प्राचार्य राधेश्याम सिकची यांच्या मार्गदर्शनात व डॉ. प्रा. अमोल गावंडे यांच्या सहकार्याने नुकताच सायबर सेक्युरिटीबाबत मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी क्विक हिल फाउंडेशन व सायबर सेक्युरिटी पुणेच्या तेजस्विनी राठोड व भाग्यश्री दौड या विद्यार्थ्यांनी सायबर क्राईम ऑनलाईन फसवणूक, वाढता सोशियल मीडियाचा वापर त्यामधून होणारी फसवणूक, आपण करीत असलेली ऑनलाईन खरेदी या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी प्लेसमेंट सेलचे डॉ. प्रा. ज्ञानशील खंडेराव यांनी व्यवसाय, सरकारी एजन्सी आणि आरोग्य सेवा संस्थांवर रॅन्समवेअर हल्ले. या हल्ल्यांमध्ये बऱ्याचदा हॅकर्स संवेदनशील डेटा एन्क्रिप्ट करतात आणि त्याच्या प्रकाशनासाठी खंडणीची मागणी करतात. फिशिंग हल्ले अधिकाधिक अत्याधुनिक झाले आहेत. ईमेल, मजकूर संदेश किंवा फोन कॉलद्वारे व्यक्ती आणि संस्थांना लक्ष्य करतात. सायबर गुन्हेगार अनेकदा बळींची फसवणूक करण्यासाठी विश्वसनीय संस्थांची तोतयागिरी करतात. सायबर क्राईम ऑनलाईन सायबर क्राईम ऑनलाईन फसवणूक, वाढती फसवणूक, वाढता सोशल मीडियाचा वापर त्यामधून होणारी फसवणूक, आपण करीत असलेली ऑनलाईन खरेदी, नवनवीन मोबाईलमध्ये येणारी खरेदी, नवनवीन मोबाईलमध्ये येणारे ॲप, फसव्या ॲप, फसव्या लिंकपासून दूर राहणे या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी एनएसएस कार्यक्रमाधिकारी डॉ. बी. के. ढोरे, प्रा. धीरज भाला, प्रा. लखन तिवारी, प्रा. डोंगरे, प्रा. हर्षद इक्बाल, प्रा. अफसर खान, प्रा. धीरज ठाकूर उपस्थित होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

Akola Edition
Oct 9, 2023 Page No. 6
epaper.dailymatrubhumi.com